RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष १, अंक १०८(३)] शनिवार, सप्टेंबर २६, २०१५/आश्विन ४, शके १९३७ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक २३१

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांव्ये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

५ वा मजला (ॲनेक्स), हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ सप्टेंबर २०१५

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक बीपीए. १०९१ /प्र.क्र. ५/राउशु-२.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास असे वाटते की, महाराष्ट्र मद्यार्क आसवन आणि पेय मद्य निर्मिती नियम, १९६६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत, आणि म्हणून मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) याच्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत.

त्याअर्थी, आता मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई २५) याच्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (बी), (जी), (एच-१), (के), (एल-३) आणि (यू) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र मद्यार्क आसवन आणि पेय मद्य निर्मिती (सुधारणा) नियम, २०१५ संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र मद्यार्क आसवन आणि पेय मद्य निर्मिती, १९६६ (यापुढे याचा उल्लेख "प्रधान नियम" असा केला आहे) मधील नियम ६ ला उपनियम (१) असा पुनःक्रमांकित करण्यात यावा,—

(*i*) उपनियम क्रमांक (१) असा पुनःक्रमांकित केलेल्या मध्ये "आणि त्यांच्याकडील साठा सहज खात्री करता येईल" या शब्दानंतर खालील शब्द समाविष्ट करावे :—

"मळीच्या बाबतीत ती पूर्णपणे आच्छादीत स्टील टाक्यांमध्ये साठविण्यात येईल".

(*ii*) उपनियम (१) नंतर खालील उपनियम समाविष्ट करण्यात यावा तो असा,—

(२) भारतीय मानक प्रमाणकानुसार आसवनीच्या प्रांगणात प्राप्त होणाऱ्या किण्वित पदार्थाचे इलेक्ट्रॉनिक वजन काट्यावर वजन केले जाईल.

३. प्रधान नियमांतील नियम ७ च्या उपनियम (३) च्या नंतर पुढीलप्रमाणे उपनियम समाविष्ट करण्यात यावा :—

" (४) (अ) मळीचे नमुने घेण्याची वारंवारीता :—

(*i*) बॅच टाईप फर्मेंटेशनसाठी ज्या साठवणूक टाकीतून मळी घेण्यात येते त्या टाकीमधून महिन्यातून एकदा किलोग्रॅम मळीचे प्रत्येकी ४ नमुने घेण्यात यावेत.

(*ii*) कन्टिन्युअस फर्मेंटेशनकरिता डे टँकमधून महिन्यातून एकदा १ किलोग्रॅम मळीचे प्रत्येकी ४ नमुने घ्यावेत.

(ब) मळीचे नमुने घेण्याची पद्धत :—

(*i*) आसवनीच्या वतीने प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत आसवनीवरील प्रभारी अधिकाऱ्याने नमुने घ्यावेत. सर्व ४ ही नमुने प्रभारी अधिकाऱ्यांच्या सीलने मोहोरबंद करावेत व त्या सीलवर प्रभारी अधिकारी व आसवनीच्या प्रतिनिधींनी एकत्र स्वाक्षरी करावी.

(*ii*) या ४ नमुन्यांपैकी १ नमुना आसवनीच्या प्रतिनिधीकडे द्यावा, १ आसवनीवरील प्रभारी अधिकाऱ्याने ठेवावा आणि उर्वरित २ नमुने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथरराणाखाली प्राधिकृत प्रयोगशाळेकडे पाठवावेत. प्रयोगशाळा नमुने मोहोरबंद असल्याची खात्री झाल्यावर नमुने स्वीकारेल व नमुने प्राप्त झाल्यापासूनच्या कार्यलयीन कामकाजाच्या ७ दिवसांच्या आत एका नमुन्याचे विश्लेषण करेल. पहिल्या नमुन्याचा विश्लेषण अहवाल पाठविल्यानंतर किमान १ महिना दुसरा नमुना जतन केला जाईल. सदर नमुना विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्याच्या १ महिन्याच्या आत विश्लेषण अहवालाच्या निष्कर्षाशी आसवनीने आक्षेप नोंदविल्यास दुसरा नमुना नाश करण्यात येईल.

(*iii*) सर्वसाधारणपणे नमुना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून कार्यालयीन कामकाजाच्या १० दिवसांच्या आत प्रयोगशाळा विश्लेषण अहवाल आसवनी अधिकारी व आसवनी यांना स्वतंत्रपणे पाठवील. विश्लेषण अहवालात एकूण विघटनशील शर्करा, किण्वनशील शर्करा, गंधकयुक्त राख, बाष्पीभवनशील आम्लता यांचा समावेश असावा. नमुन्याचे विश्लेषण सर्वसाधारण (ambient) तापमानास करण्यात यावे.

(*iv*) जर आसवनीस विश्लेषण अहवाल मान्य असेल तर आसवनीमध्ये असलेले उर्वरित नमुने त्याच बॅच क्रमांकाच्या मळी साठवणूक टाकीमध्ये मिसळण्यात यावेत.

(*v*) जर विश्लेषण अहवालामध्ये त्रुटी आहेत असे आसवनीस वाटत असेल तर त्यांनी विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत प्रयोगशाळेस त्याबाबत लेखी कळविले पाहिजे. अशाप्रकारचे पत्र आसवनीकडून प्राप्त झाल्यावर प्रयोगशाळेत असलेल्या दुसऱ्या नमुन्याचे विश्लेषण आसवनीच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत प्रयोगशाळा करेल. दुसऱ्या नमुन्याचा विश्लेषण अहवाल हा अंतिम असेल.

(*vi*) आसवनी व आसवनीवरील प्रभारी अधिकारी यांनी दोन वर्षे किंवा आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेल्या आदेशानुसार विश्लेषण अहवाल जतन करणे आवश्यक राहील.

(*vii*) मळी व्यतिरिक्त इतर किण्वित पदार्थांकरिता नमुना घेण्यात प्रमाण आणि नमुना घेण्याची पद्धत ही प्रयोगशाळा आणि रासायनिक विश्लेषण यांना बंधनकारक असलेल्या तरतुदींचा अवलंब करून ठरविण्यात यावे. तथापि, नमुने दर महिन्यास घेण्यात यावेत आणि आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी त्याकरिता प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळा किंवा रासायनिक विश्लेषक यांकडे पाठविण्यात यावे. प्रयोगशाळा किंवा रासायनिक विश्लेषक यांचेकडून प्राप्त झालेले अहवाल आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी विहित केलेल्या नमुन्यांमध्ये जतन करण्यात यावेत.".

४. प्रधान नियमांतील नियम ८ च्या उपनियम (३) च्या नंतर खालीलप्रमाणे उपनियम समाविष्ट करण्यात यावा :—

" (४) बॅच टाईप फर्मेंटेशन आणि कन्टीन्यूअस फर्मेंटेशनच्या बाबतीत किण्वन कार्यक्षमता अनुक्रमे ८५ टक्के व ८७ टक्के असावी.".

५. प्रधान नियमांतील नियम ९ च्या उपनियम (२) च्या नंतर खालीलप्रमाणे उपनियम समाविष्ट करण्यात यावा :-

"(३) बॅच टाईप कन्टीन्यूअस आणि फर्मेंटेशनच्या बाबतीत उर्ध्वपतन कार्यक्षमता अनुक्रमे ९७ टक्के असावी आणि ती मळीच्या प्रतवारीच्या थेट प्रमाणात असावी.".

**मळीच्या प्रतवारीप्रमाणे प्राप्त होणाऱ्या मद्यार्काचा उतारा दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे :—**

| मळीची प्रतवारी | टी.आर.आस. (एकूण विघटनशील शर्करा) | प्रति मेट्रिक टन मळीपासून मद्यार्काचा उतारा | | |
|---|---|---|---|---|
| | | ए.एल. (अल्कोहोल लिटर) | बी.एल. (बल्क लिटर) | पी.एल. (प्रुफ लिटर) |
| A | ५० आणि त्यापेक्षा जास्त | २३३ | २४५ | ४०७ |
| B | ४४ ते ४९.९ | १९४ | २०३ | ३३८ |
| C | ४० ते ४३.९ | १५० | १५६ | २६२ |

**स्पष्टीकरण :–** मद्यार्काची उपलब्धता निश्चित करण्याच्या दृष्टीने खालील दोन बाबी विचारात घेण्यात याव्यात :-

"(अ) त्या महिन्यामध्ये उर्ध्वपतनासाठी वापरण्यात आलेली मळी ; आणि

(ब) त्या महिन्यामध्ये उर्ध्वपतनासाठी वापरण्यात आलेल्या मळीमधील विघटनशील शर्करेचे प्रमाण.".

६. प्रधान नियमांतील नियम १३ मध्ये,—

(१) उपनियम (३) च्या खंड (*iii*) मधील खंड (ब) खालीलप्रमाणे वगळण्यात यावा :—

"(ब) (*i*) ५० टक्के आणि त्यापेक्षा जास्त विघटनशील शर्करा असलेल्या प्रति मेट्रीक टन मळीपासून प्राप्त होणाऱ्या मद्यार्काचा उतारा २४५ ब.लि. किंवा ४०७ प्रु. लि. पेक्षा कमी असेल असे दर्शविणारे नमुना XII विवरणपत्र."

"(*ii*) ४४ ते ४९.९० टक्के च्या दरम्यान विघटनशील शर्करा असलेल्या प्रति मेट्रीक टन मळीपासून प्राप्त होणाऱ्या मद्यार्काचा उतारा २०३ ब. लि. किंवा ३३८ प्रु. लि. पेक्षा कमी असेल असे दर्शविणारे नमुना XII विवरणपत्र."

"(*iii*) ४० ते ४३.९० टक्के च्या दरम्यान विघटनशील शर्करा असलेल्या प्रति मेट्रीक टन मळीपासून प्राप्त होणाऱ्या मद्यार्काचा उतारा १५६ ब. लि. किंवा २६२ प्रु. लि. पेक्षा कमी असेल असे दर्शविणारे नमुना XII विवरणपत्र."

"(*iv*) मळीव्यतिरिक्त इतर किण्वित पदार्थापासून प्राप्त होणाऱ्या मद्यार्काचा उतारा खाली दिलेल्या तक्त्यात दर्शविलेल्या मर्यादापेक्षा कमी असल्यास नमुना XII विवरणपत्र."

| किण्वन पदार्थ | स्टार्च (तवकीर) ची टक्केवारी | मद्यार्काचा उतारा ब.लि./प्रति मे.ट. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| ज्वारी | ७५-८० | ७९०-५२० |
| गहू | ६५-७० | ४३०-४६० |
| बाजरी | ७०-७५ | ४६०-४९० |
| मका | ६५-७० | ४३०-४६० |
| टरफलरहित तांदूळ | ८०-९० | ५२०-५४० |
| साबुदाणा | ६५-७५ | ४३०-४६० |
| बटाटा | १५-२० | १००-१३० |
| बार्ली | ५०-६० | ३००-४२० |
| उसाचा रस | — | ७५-८० |
| मोहा फुले | (सरासरी शर्करा ७० टक्के) | ३००-३५० |
| काजू बोंडे | (सरासरी शर्करा ११.६० टक्के) | ५३.३६ |

७. प्रधान नियमांतील नमुना "I" मधील अट क्रमांक (१९) च्या उप अट क्रमांक (६) मधील "जेव्हा मद्यकाचे वितरण वजनकाट्यावर होते" या शब्दांऐवजी "मद्यार्कांचे वितरण इलेक्ट्रॉनिक वजनकाट्याने यथोचित करण्यात यावे आणि" हे शब्द समाविष्ट करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अं. शा. घार्गे,**

शासनाचे सहसचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, 5th Floor,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 8th September 2015.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No.BPA.1091/CR-5/Exc-2.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966 should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949).

Now therefore, in exercise of the powers conferred by clauses *(b), (c), (f), (g), (h1), (k), (l3)* and *(u)* of sub-section *(2)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949), the Government of Maharashtra hereby the makes the following rules further to amend the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966, as follows, namely :—

1. *Short Title.*— These rules may be called the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor (Amendment) Rules, 2015.

2. Rule 6 of the Maharashtra Distillation of Spirit and Manufacture of Potable Liquor Rules, 1966 (hereinafter referred to as "the principal Rules"), shall be re-numbered as sub-rule (1),—

*(i)* in sub-rule (1) so re-numbered, after the words "and that their stock can be easily ascertained." the following words shall be added "In case of molasses it shall be stored in fully covered steel tanks.";

*(ii)* after sub-rule (1), the following sub-rule shall be added, namely :—

"(2) The fermentive basses on receipt on the distillery premises shall be measured on electronic weighments which confirms to the Bureau of Indian Standards (BIS).".

3. In rule 7 of the principal Rules, after sub-rule (3), the following sub-rule shall be added, namely :—

"(4) *(a)* Frequency of drawing Molasses samples :—

*(i)* Four samples of one kilogram each of molasses shall be drawn once in a month from the storage tank wherefrom the molasses is obtained in the case of batch type fermentation.

*(ii)* Four samples of one kilogram each of molasses shall be drawn once in a month from the "day tank" in the case of continuous fermentation.

*(b)* Methods of drawing samples :—

*(i)* The samples shall be drawn by the distillery officer in the presence of distillery representative duly authorized in this behalf by the distillery. All the four samples shall be sealed with the seal of the distillery officer, and the seal shall carry the joint signatures of the distillery officer and distillery representatives.

*(ii)* Out of the four samples one sample shall be issued to be distillery representative, one shall be retained by the distillery officer and the two remaining samples shall be send to the authorised laboratory under State Excise escort. The laboratory shall accept the samples if the seals are intact and analyse one sample normally within seven working days from the date of receipt of the samples. The second sample duly sealed shall be preserved by the laboratory for atleast one month after sending the analysis report of the first sample. If the distillery within a period of one month from the date of receipt of the analysis report does not contest the results of the analysis report it may be disposed off.

*(iii)* The laboratory shall send the analysis report to the distillery officer and to the distillery separately, normally within ten working days from the date of receipt of sample. The sample report shall contain the percentage of total reducing sugars, fermentable sugars, sulphated ash and volatile acidity. The analysis shall be carried out at ambient temperature.

*(iv)* If the distillery accepts the analysis report, the remaining samples lying with the distillery of the same batch number shall be added back to the molasses in storage tank.

*(v)* In case the analysis report is contested by the distillery the distillery shall inform the laboratory in writing accordingly within seven days from the date of receipt of analysis report. On receipt of such letter from the distillery, the second sample with the laboratory shall be used for analysis in the presence of the representative of the distillery. The second analysis report shall be final.

*(vi)* The analysis shall be preserved by the distillery officer and the distillery for two years or as may be directed by the Commissioner, State Excise, Maharashtra State, Mumbai.

*(vii)* In the case of fermentive bases other than molasses, the quantity and method of drawing samples shall be in the manner as stipulated in the statutory provisions of the chemical analyser or laboratory. However, the samples shall be drawn on a monthly basis and sent to the chemical analyser or laboratory authorised by the Commissioner of State Excise to that extent. The reports obtained from the chemical analyser or laboratory shall be maintained in the proforma prescribed by the Commissioner of State Excise.".

4. In rule 8 of the principal Rules, after sub-rule (3), the following sub-rule shall be added, namely :—

"*(4)* The fermentation efficiency in the case of hatch type fermentation and continuous fermentation shall be 85 per cent. and 87 per cent. respectively.".

5. In rule 9 of the principal Rules, after sub-rule (2), the following sub-rule shall be added, namely :—

"(3) The distillation efficiency shall be 97 per cent. in both, batch wise and continuous fermentation process and it will be in direct proportion to the grade of the molasses.

**A chart specifying the yield of spirit against a given grade molasses is as follows :-**

| Grade of molasses | T.R.S. (Total Reducing Sugar) | Recovery of Spirit per M.T. of molasses minimum | | |
|---|---|---|---|---|
| | | A.L. (Alcohol Litre) | B.L (Bulk Litre) | P. L. (Proof Litre) |
| A | 50 and above | 233 | 245 | 407 |
| B | 44 to 49.9 | 194 | 203 | 338 |
| C | 40 to 43.9 | 150 | 156 | 262 |

*Explanation.*—In order to determine the yield of spirit, following two factors shall be considered,—

(*a*) the molasses used for distillation in the given month; and

(*b*) the count of fermentable sugars in molasses which was used for distillation in the given month.

6. In rule 13 of the principal Rules,—

*(1)* in sub-rule (3), in clause *(iii)* for clause *(b)*, the following shall be substituted, namely:—

"*(b)* (*i*) a statement in Form XII showing where the out turn of spirit is less than 245 bulk litres or 407 proof litres per metric ton, of molasses if the percentage of total reducing sugar present in molasses is 50 and above.

*(ii)* a statement in Form XII showing where the out turn of spirit is less than 203 bulk litres or 338 proof litres per metric ton of molasses if the percentage of total reducing sugar present in molasses is in between the range 44 to 49.9.

*(iii)* a statement in Form XII showing where the out turn of spirit is less than 156 bulk litres or 262 proof litres per metric ton , of molasses if the percentage of total reducing sugar present in molasses is in between the range 40 to 43.9.

*(iv)* a statement in Form XII in the case of fermentive bases other than molasses showing where the out-turn of spirit is less than the prescribed limit as enumerated in the chart given below :–

| Fermentive Base (1) | Starch Percentage (2) | Yield BLT/MT (3) |
|---|---|---|
| Jowar | 75-80 | 490-520 |
| Wheat | 65-70 | 430-460 |
| Bajra | 70-75 | 460-490 |
| Maize | 65-70 | 430-460 |
| Dehusked rice | 80-90 | 520-540 |
| Tapioca | 65-75 | 430-460 |
| Potatoes | 15-20 | 100-130 |
| Barley | 50-60 | 300-420 |
| Sugarcane Juice | — | 75-80 |
| Mhowra Flowers | (Average Sugar 70%) | 300-350 |
| Cashew Apple | (Average Sugar 11.60%) | 53.36 |

7. In Form I of the principal Rules, in condition (19), in sub-condition (6), for the words " where issues of spirit are made by weighment," the words "the issues of spirit shall be weighed appropriately on the electronic weighments and" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. GHARGE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.